college permission

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषी परिषद
२००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५५१२/८५०

दि. २० एप्रिल,२०१६

## परिपत्रक

**विषयः- विना अनुदान तत्वावरील कृषी व संलग्न विद्या शाखांचे नवीन पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राथमिक कार्यपध्दती व निकष.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर कृषी व संलग्न विद्या शाखेच्या पदवी महाविद्यालयांना कृषी परिषदेकडून मान्यता प्रदान करण्यात येते. याअंतर्गत कृषी, उद्यानविद्या, वानिकी, मत्स्यशास्त्र, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, कृषी जैवतंत्रज्ञान, कृषी व्यवसाय व्यवस्थापन, गृहविज्ञान, पशुसंवर्धन हया विद्याशाखा अंतर्भूत आहेत. या विद्याशाखांची पदवी महाविद्यालये कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी कृषी परिषदेने वेळोवेळी केलेल्या ठरावानुसार खालील प्राथमिक कार्यपध्दती व निकष निश्चित करण्यात येत आहेत.

१. नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसंबंधी संस्थांकडून अर्ज प्राप्त करणे, संस्थेच्या पात्रतेसंबंधी छाननी करणे, अर्ज व माहिती पुस्तिका देणे, मान्यतेविषयक प्रस्तावाची प्रक्रिया करणे, प्रस्तावातील त्रुटी निश्चित करणे, त्यांची पूर्तता तपासणेविषयी कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८, दि.११/२/२०१६ अनुसार कार्यवाही करण्यात येईल.

२. कृषी, उद्यानविद्या, वानिकी ('अ' गट) हया विद्याशाखांपैकी कोणतेही महाविद्यालय सुरु करावयाचे असल्यास प्रत्येक महाविद्यालयाकरिता संस्थेच्या मालकीची १०० एकर (४० हेक्टर) जमीन अनिवार्य आहे.

३. इतर विद्याशाखा ('ब' गट) पैकी कोणतेही महाविद्यालय सुरु करावयाचे असल्यास प्रत्येक महाविद्यालयाकरिता संस्थेच्या मालकीची ५० एकर (२० हेक्टर) जमीन अनिवार्य आहे.

४. आवश्यक असलेली जमीन प्रस्तावित महाविद्यालयापासून १० कि.मी. परिसरात असणे अनिवार्य आहे.

५. एका संस्थेस प्रथम एक व त्यानंतर एक असे एकूण दोन शाखेतील महाविद्यालयांपेक्षा जास्त महाविद्यालये मान्य करण्यात येणार नाही. (ज्या संस्थांनी यापूर्वी विना अनुदानित महाविद्यालयांकरिता माहिती पुस्तिका व अर्ज प्राप्त केलेले आहेत अशा संस्था नवीन महाविद्यालयाकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची पूर्तता करीत असल्यास त्यांचा वाढीव शुल्काप्रमाणे विचार करण्यात येईल.)

६. रेनवॉटर हार्वेस्टींग, सौर ऊर्जा, सेंद्रिय शेती हया सुविधा असणे आवश्यक आहे.

७. ज्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, त्या विद्याशाखेचे महाविद्यालय प्रस्तावित नवीन महाविद्यालयाच्या ५० कि.मी. परिसरामध्ये नसावे.

८. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर कृषी व संलग्न महाविद्यालयास मान्यता मिळाल्यानंतर खाजगी संस्थांनी प्रयोगशाळा, वसतीगृह इत्यादी अनुषंगिक सोयी-सुविधा पहिल्या वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर सोयी-सुविधांची पूर्तता झाल्याचा कृषी विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील शैक्षणिक वर्षात अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. तथापि, संस्थेची प्रगती, आर्थिक स्थिती इत्यादी बाबी विचारात घेऊन काही बाबी क्षमापित / सूट देण्याचे अधिकार कृषी परिषद / मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांना देण्यात आलेले आहेत.

**महासंचालक**

प्रति,

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९ यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.

प्रतः- मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे विशेष कार्य अधिकारी, मा. मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रतः- मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, कृषी परिषद, पुणे